## मालमत्ता विनियोगासाठी महानगरपालिकेने मंजूर केलेले धोरण/ठराव

| अ नं | विषय | मा.सर्व साधारण सभेच्या मंजूरीचा ठराव क्रमांक व दिनांक | तपशिल |
|---|---|---|---|
| 01 | एस.टी.डी./ पी. सी.ओ. झेरॉक्स-फॅक्स/ दुध केंद्र/लॉटरी तिकीट विक्री/ वृत्तपत्र विक्री/ पानबिडी स्टॉल इत्यादी व्यवसाय भाडयाने देणे. | मंजूर ठराव क्र.58<br>दि.15/01/2003<br>मंजूर ठराव क्र.1952, दि.14/09/2017<br>मंजूर ठराव क्र.444, दि.24/07/2018 | 1. नवी मुंबई क्षेत्रात दिव्यांग व्यक्तीकरीता व्यवसायासाठी जागा देणे बाबत धोरण ठराव क्र.58, दि.15/1/2003 अन्वये करण्यात आलेले होते. त्यानुसार 10 वर्षासाठी 91 जागा वितरीत करण्यात आल्या होत्या. सदर करारनामे सन 2013-14 मध्ये संपुष्टात आलेले आहे.<br><br>2. दिव्यांग व्यक्तींना स्वयंरोजगाराकरीता यापुर्वी वाटप केलेल्या जागा मा.महापालिका सर्वसाधारण सभा ठराव क्र.1952, दि.14/09/2017 नुसार पुनश्च प्रस्ताव मागवुन प्राप्त अर्जाप्रमाणे प्रस्ताव मा.महापालिका सर्वसाधारण सभेकडे मान्यतेस्तव पाठविण्यात आला होता. सदर ठरावास मा.महापालिका सर्वसाधारण सभेने ठराव क्र.444, दि.24/07/2018 अन्वये मुदतवाढ देणेस मंजूरी दिलेली आहे. |
| 02 | नवी मुंबई महानगरपालिकेचे समाजमंदिरे / सांस्कृतिक भवन/ बहुउद्देशिय इमारती वापर | 1.मंजूर ठराव क्र.427, दि.15/10/2008 व<br>उप सुचनेसह मंजूर ठराव क्र.1141, दि.15/02/2010<br>ठराव क्र.676, दि.20/10/2018 | 1. नवी मुंबई महानगरपालिकेची समाजमंदिर/सांस्कृतिक भवन/बहुउद्देशिय इमारतीच्या वापरासंबंधीच्या प्रशासनाच्या धोरणास मा.महापालिका सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.427 अन्वये मान्यता दिलेली आहे.<br>2. नवी मुंबई महानगरपालिकेची समाजमंदिरे, सांस्कृतिक भवन, बहुउद्देशिय इमारती नोंदणीकृत संस्थांना चालविण्यास देण्यासंबंधात महानगरपालिकेच्या दि.15/10/2008 च्या ठराव क्र.427 मध्ये अंशत फेरबदल करुन आयुक्तांच्या उपरोक्त पत्रामध्ये नमुद केल्याप्रमाणे ज्या संस्था/मंडळे नागरीकांना कोणतेही शुल्क आकारत नाहीत अशा संस्था मंडळे यांना आयुक्तांनी प्रस्ताविले आहे. त्याऐवजी सरसकट दरमहा रु.500/- आणि ज्या संस्था/मंडळे नागरीकांना शुल्क आकारतात अशा संस्था/मंडळे यांना आयुक्तांनी प्रस्ताविले त्याप्रमाणे प्रति चौ.फुटास दरमहा रु.5/- ऐवजी रु.2/- याप्रमाणे भाडे आकारण्यास आणि 5/- वर्षाच्या कालावधीकरीता पात्र सामाजिक संस्थांना भाडेपट्टयाने देण्याचे अधिकार मा.आयुक्तांना देण्यास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम कलम 79 (क) (इ) अन्वये सुचविल्याप्रमाणे मंजूरी देण्यात आली आहे.<br><br>3. महानगरपालिकेच्या समाजमंदिरे/ सांस्कृतिक भवन / स्टेज/ व्यायामशाळा/ आंतरक्रिडा संकुल/ वाचनालय/ अभ्यासिका/ बहुउद्देशिय इमारती इ. सामाजिक वापराच्या इमारतीचे भाडे दर निश्चित करणेबाबतच्या प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह. उक्त ठरावाची अंमलबजावणी करतांना, एकाच जागेसाठी सशुल्क व नि:शुल्क सेवा देणा-या संस्थांनी अर्ज केल्यास सशुल्क सेवा देणा-या संस्थेची निवड करावी की, नि:शुल्क सेवा देणा-या संस्थेची निवड करावी अशा प्रश्न उपस्थित होतो. त्यामुळे अशा प्रकारे प्रस्ताव प्राप्त झाल्यास यापुढे सशुल्क संस्थेस प्राधान्य देणेस, महाराष्ट्र महापालिका अधिनियम कलम 79 अन्वये, सुचविल्याप्रमाणे, मंजुरी देण्यात आली आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| 03 | नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील तलाव व धारण तलाव मत्स्य उत्पादन व नौका विहाराकरीता भाडेपट्टयाने देणे. | मंजूर ठराव क्र.1348<br><br>दिनांक 20/07/2012 | आयुक्तांच्या उपरोक्त पत्रामध्ये नमुद केलेल्या अटी व शर्तीनुसार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 च्या कलम 73 प्रमाणे सविदा करणे, निविदा मागविणे व अधिकतम देकार नमुद केलेल्या संस्थेचे दर स्विकृत करुन कार्यादेश देण्याचे अधिकार मा.आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांना देण्यास आणि नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील तलाव व धारण तलाव मत्स्य उत्पादन व नौका विहाराकरीता 5 वर्षे कालावधीसाठी भाडेपट्टयाने देण्याच्या धोरणास मुंबई महानगरपालिका अधिनियम कलम 79 नुसार मंजूरी देण्यात आली आहे.<br><br>महानगरपालिकेचे तलाव वारंवार जाहीरात देऊनही निविदा प्राप्त होत नसल्याने, महाराष्ट्र शासनाच्या सुधारीत धोरणानुसार कार्यवाही करणे मा.आयुक्त सो. यांनी मंजूरी दिलेली आहे. |
| 4 | नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील महापालिका इमारतीमध्ये सुरु असलेल्या ग्रामिण अंगणवाडयांच्या भाडे आकारणी | मंजूर ठराव क्र.1034<br><br>दिनांक 10/03/2015 | नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील एकात्मिक बाल सेवा योजनेअंतर्गत कार्यरत असलेल्या ग्रामिण अंगणवाडयाकरीता दर महा रु.200/- आणि नागरीक प्रकल्पातील अंगणवाडयाना दर महा रु.750/- |
| 5 | नवी मुंबई महानगरपालिका अधिकारी/ कर्मचारी यांचे निवासस्थान वाटप व | मंजूर ठराव क्र.ङ701<br>दिनांक- 20/11/2015 | नवी मुंबई महानगरपालिका मालकीचे निवास्थान अधिकारी/कर्मचारी यांना वाटप करण्याचे धोरण व शासन निर्णयाप्रमाणे वेळोवेळी |
| 6 | विद्युत/दूरसंचार/नैसर्गिक वायु इत्यादी साठीच्या सार्वजनिक वापरासाठी दिलेल्या जागांचे भुईभाडे आकारणीबाबत. | मंजूर ठराव क्र. 919<br><br>दिनांक 03/03/2016 | विद्युत/दूरसंचार/नैसर्गिक इत्यादीसाठीच्या सार्वजनिक वापराकरीता महापालिकेच्या जागा वार्षिक भुईभाडे आकारुन " लिव्ह ऍण्ड लायसन्स तत्वावर " देण्यास आणि सद्यस्थितीत कार्यान्वीत |
| 7 | झुणका भाकर ठिकाणी इतर आहार योजना सुरु करणेबाबतचा धोरण | मंजूर ठराव क्र. 1200<br>दिनांक 26/08/2016 | मा.महापालिका सर्वसाधारण ठराव क्र.1200, दि.26/08/2016 अन्वये झुणका भाकर केंद्राच्या जागा आहार योजनेंतर्गत पूर्वीच्या लाभार्थींना |
| 07A | रिक्त झुणका भाकर केंद्राच्या जागा आहा योजनेंतर्गत वाटप करणेबाबत. | मा.महासभा ठराव क्र.1708,<br>दि.20/02/2020 | नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील रिक्त झुणका भाकर केंद्राच्या जागा “आहार योजनेंतर्गत” लिव्ह ॲण्ड लायसन तत्वावर वाटप करणेबाबत. |
| 08 | नवी मुंबई महानगरपालिका मासळी मार्केट इमारतीमधील ओटले/गाळे भाडेतत्वावर देणेबाबत. | मंजूर ठराव क्र.840,<br><br>दिनांक 26/08/2014 | 1. नवी मुंबई महानगरपालिका मासळी मार्केटमधील ओटले मासळी विक्रेत्यांना चालु बाजार मुल्यांकनानुसार निश्चित केलेले मासिक भुईभाडे व कलम 386 अन्वये वेळोवेळी निश्चित केलेले अनुज्ञाप्ती शुल्क वसुल करुन अनुज्ञापत्र देण्यास कलम 332 नुसार मा.महापालिका सर्वसाधारण ठराव क्र.840 दि.26/8/2014 रोजी मंजूरी देण्यात आलेली आहे.<br>2. सदर ओटले वाटपासंदर्भातील अधिकार मा.स्थायी समिती ठराव क्र.55 दि.22/09/2016 व मा.आयुक्त यांची दि.13/1/2017 रोजी मंजूर अन्वये उप आयुक्त (परि-1/2) यांना संविदा, करारनामा व भाडेवसुलीचे आधिकार प्रदान केलेले आहे.<br><br>3. भाजी व फळ मार्केट मधील ओटले/पिचेस वाटप करण्याचे धोरण मा.महापालिका सर्वसाधारण ठराव क्र. 1279 दिनांक 15/02/2017 रोजी मा.आयुक्तांकडून परत पाठविण्यात आलेला होता.<br><br>4. पथविक्रेता (उपजिविका संरक्षण व पथ विक्री विनियमन महाराष्ट्र) योजना 2017 नुसार विक्री प्रक्षेत्र व विक्री शुल्क आकार निश्चित करुन महानगरपालिका क्षेत्रातील ओटले/पिचेस वितरणासाठीबाबतचा सुधारीत धोरण दि.20/11/2018 रोजी मा.महासर्वसाधारण सभेत विषय क्र.08 अन्वये घेणेत आलेला आहे. |
| 9 | नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील दुकान गाळे भाडेतत्वावर देणेबाबत. | मंजूर ठराव क्र.1202 दि.26/08/2016 | 1. नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील वाणिज्य वापरातील दुकान/गाळे भाडेतत्वावर देणेकरीता मा. आयुक्त सो यांना मा.महापालिका सर्वसाधारण सभा ठराव क्र.1202, दि.26/08/2016 अन्वये संविदा करणेकरीता अधिकार प्रदान केलेले आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| 10 | बहुउद्देशिय इमारती मधील (मंगल कार्यालय) जागा विविध प्रयोजनासाठी भाडेतत्वावर देणे. | मंजूर ठराव क्र.378, दि.18/03/2018 | नवी मुंबई महानगरपालिकेने नागरीकांना मंगलकार्य, साखरपुडा, मुंज, वाढदिवस इत्यादी प्रयोजनासाठी बहुउद्देशिय इमारतीमधील हॉल भाडेतत्वावर देणेकरीता मा.महापालिका सर्वसाधारण सभा ठराव क्र.378, दि.18/03/2018 अन्वये मंजूरी दिलेली आहे. |
| 11 | | मंजूर ठराव क्र.1131, दि.25/06/2019 | नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्राबाहेरील नागरीकांना मा.आयुक्तांनी शिफारस केलेले दर लागू करणेत आलेले आहे. |
| 12 | केंद्र शासन/महाराष्ट्र शासन/सिडको/MIDC कडे प्राप्त मागणी भूखंड मिळणेबाबत. | मंजूर ठराव क्र.609, दि.30/06/2014 | केंद्र शासन/महाराष्ट्र शासन/सिडको/MIDC कडे विविध सामाजिक, शैक्षणिक प्रयोजनाकरीता ठराव क्र.609, दि.30/06/2014 अन्वये राज्य शासनास भूखंड मिळणेकरीता मागणी करणेत आलेली आहे. |
| 13 | एम्फीबीअस बस सेवा सुरु करणेबाबत. | मंजूर ठराव क्र.270, दि.17/02/2018 | नवी मुंबई पर्यटन स्थळ विकसित करण्याच्या दृष्टीने जे.एन.पी.टी. व नवी मुंबई महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने नमुंमपा मुख्यालय पामबीच मार्ग ते सेक्टर-26 नेरुळ येथील धारण तलावामध्ये एम्फीबीअस बसे सेवा सुरु करणेकरीता ठराव क्र.270, दि.17/02/2018 अन्वये मंजूरी मिळालेली आहे.<br><br>परंतु दि.25/01/2019 रोजीच्या पत्राद्वारे जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट यांनी सदर धारण तलावामध्ये ॲम्फीबीअस बस प्रकल्प सुरु करणेस असमर्थता दर्शविलेली आहे. |
| 14 | उपहारगृ/फुडकोर्ट 05 वर्षाकरीत परवानगी व अनुज्ञा तत्वावर देणे. | मंजूर ठराव क्र. 322, दि.18/05/208 | मा.महापालिका सर्वसाधारण ठराव क्र. 322, दि.18/05/2018 मंजूर ठरावान्वये महापालिकेचे उपहारगृह/फुडकोर्ट जाहीर निविदा प्रसिध्द करुन स्पर्धात्मकरित्या जादा दर देणाऱ्या व्यक्ती/संस्था यांना 05 वर्षासाठी परवनगी व अनुज्ञा (लिव्ह ॲण्ड लायसन) तत्वावर वितरीत करण्याचे व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 73 प्रमाणे संविदा करण्याचे अधिकार मा. आयुक्त, नमुंमपा यांना प्रदान केलेले आहे. |
| 15 | ठाणे-बेलापूर रस्ता रुंदीकरणात बाधीत होणाऱ्या झोपडयांचे दिघा येथील OS-1 भूखंडातील AM-5 या भूखंडावर पुनर्वसन करणेबाबत | ठराव क्र.1123 दि.18/6/2016 | सदर उपसूचनाच्या अनुषंगाने प्रचलित नियमांशी सुसंगत नसणाऱ्या सूचना मान्य करता येणार नाही, असे मा.महापालिका सर्वसाधारण सभेमध्ये आयुक्तांनी स्पष्ट केले होते. त्यानुसार जा.क्र.नमुंमपा/मालमत्ता/ 2806/2016, दि.13/10/2016 नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 79 (ड) व 79(2ग) मधील तरतूदी विचारात घेता प्रस्तुत मा.महापालिका सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.1123, दि.17/06/2016 महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 451 नुसार विखंडित करणेस विनंती केलेली आहे |
| 16 | वाशी से-16अे येथील पार्किंग मधील किऑक्स. | मा.महासभा ठराव क्र.730, दि.20/11/2018 | महापालिकेने वाशी से-16अे येथे पार्किंग क्षेत्रामध्ये महापालिकेच्या विविध प्रयोजनाकरीता 30 किऑक्स बांधणेत आलेले होते. परंतु महापालिकेचा उद्देश सफळ होत नसल्याने, सदरचे किऑक्स भाडयाने देणेकरीता निविदा मागवणिचे प्रस्तावित होते. परंतु सदर किऑक्स नाल्यावर बांधणेत आलेली असल्यामुळे बांधकाम OC नाही. त्यामुळे सदरचे किऑक्स भाडयाने देणेबाबतचा मा. महापालिका सर्वसाधारण सभेने ठराव क्र.730, दि.20/11/2018 अन्वये नामंजूर केलेला आहे. तसेच मा.आयुक्त सो यांनी सदरचे किऑक्स निष्कासित करणेबाबत आदेशीत केल्याप्रमाणे नस्ती शहर अभियंता विभागाकडे वर्ग करणेत आलेली आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| 17 | नवी मुंबई महानगरपालिकेच्या मालमत्तांची यादी अद्ययावत करणे, पडताळणी करणे, अभिलेखाचे अंकेक्षण करणे व मालमत्तांचे मुल्यांकन (Valuation) करणेकरीता निविदा मागविणेबाबत | ठराव क्र.1106, दि.08/03/2019 मंजूरी | नवी मुंबई महानगरपालिकेच्या मालमत्तांची यादी अद्ययावत करणे, पडताळणी करणे, अभिलेखाचे अंकेक्षण करणे व मालमत्तांची मुल्यांकन (Valuation) करणेकरीता वृत्तपत्रात जाहीरात देऊन RFP मागविण्यास व कमीत-कमी दर नमुद करणाऱ्या संस्थेकडून काम करुन घेण्यास मा.महापालिका सर्वसाधारण सभा ठराव क्र.1106, दि.08/03/2019 रोजी मान्यता दिलेली आहे. त्याअनुषंगाने कार्यवाही प्रस्तावित आहे. |
| 18 | सिडकोकडून टॅक्सी रिक्षा पार्किंग या प्रयोजनासाठी महानगरपालिकेस हस्तांतरीत झालेल्या भूखंडाचा विनियोगाबाबत. | मा.महासभेकडे प्रस्तावित. | सिडकोकडून महानगरपालिकेस एकुण 43 भूखंड टॅक्सी रिक्क्षा पार्किग या प्रयोजनासाठी हस्तांतरीत झालेले असून, सदर जागा भुखंड मनपा क्षेत्रातील टॅक्सी रिक्क्षा पार्किंग संघटनांना परवाना व अनुज्ञाप्ती तत्वावर 05 वर्ष कालावधी करीता प्रत्येक वर्षी करारनामा नुतणीकरणाच्या अटीवर उपलब्ध करुन देणेबाबतचा प्रस्ताव दि.19/07/2019 रोजीच्या मा.महापालिका सर्वसाधारण सभेकडे प्रस्तावित ओह. |
| 19 | श्रीम.पुष्पा मातेले यांनी त्यांच्या जागेत महापालिकेने शौचालय बांधलेले असल्यामुळे, सदर शौचालयाच्या ठिकाणी अथवा व्यवसायासाठी पर्यायी जागा उपलब्ध करुन देणेबाबत विनंती. | ठराव क्र.1294, दि.20/08/2019 | मा.महापालिका सर्वसाधारण सभेने ठराव क्र.1294, दि.20/08/2019 अन्वये श्रीम.पुष्पा विठ्ठल मातेले यांना भूखंड क्र.23डी सेक्टर-5, येथील फेरीवाला/हॉकर्स झोनमधील एसटीडी/पीसीओ/मिल्क बुथ जवळील क्षेत्र 56 चौ.फुट (7"X8") ही जागा निविदा न मागविता "रेडी रेकनर" दराने प्रत्येक वर्षी लिव्ह अ‍ॅण्ड लायसन करारनामा करण्याच्या अटीवर उपलब्ध करुन देणे <u>या ऐवजी रु.500/- प्रतिमहा अशा प्रकारे आकारणी करणे या सुधारणेसह</u> मंजूरी दिलेली आहे |
| 20 | सावलीगांव, नवी मुंबई येथील गावठाणाचे पुनर्वसनाबाबत. | ठराव क्र.1293, दि.20/08/2019 | सावलीगांव येथील निष्कासित बांधकाम बाधितांच्या पुर्नवसनाकरीता, सिडकोकडून पात्र लाभ धारकांची तपासणी करुन व ज्या पात्र प्रकल्पग्रस्तांचे/बांधकाम धारकांचे पुर्नवसन झालेले नाही. त्यांचे विहीत नियमाप्रमाणे व आवश्यक त्यामंजूरीनुसार पुर्नवसन करणेस व उर्वरित भूखंड निवासी प्रयोजनासाठी विकसीत करण्यात येईल या अटीवर सेंट्रल पार्क सेक्टर घणसोली येथे सिडकोच्या जमिन वाटप |
| 21 | नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील दिव्यांग व्यक्तीस स्वयंरोजगारासाठी जागा उपलब्ध करुन देणेकरीता तयार करण्यात आलेल्या "प्रतिक्षा यादी" अर्जाबाबत. | ठराव क्र.1521, दि.20/12/2020 | सद्यस्थितीमध्ये दिव्यांगांना स्वयंरोजगाराकरीता जागा वाटप करण्यासाठी महानगरपालिकेकडे जागा शिल्लक नाहीत. तथापि, दि.11/02/2019 रोजीच्या वृत्तपत्रात प्रसिध्द केलेल्या जाहिरातीस अनुसरुन 714 जागांकरीता मागणी अर्ज प्राप्त झालेले आहेत. त्यामुळे दिव्यांगांना स्वयंरोजगारासाठी जागा उपलब्ध करुन देण्याकरीता सिडकोकडे जागेची मागणी करणे आवश्यक असून सिडकोकडून जागा प्राप्त झाल्यानंतर संगणकीय सोडत (Computeries Lottery) पध्दतीने जागा वाटप करण्याच्या धोरणास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 77 नुसार मा.महापालिका सर्वसाधारण सभेने मंजूरी दिलेली आहे. |
| 22 | सिडकोकडून टॅक्सी रिक्षा पार्किंग या प्रयोजनासाठी महानगरपालिकेस हस्तांतरीत झालेल्या भूखंडाच्या विनियोगाबाबत | ठराव क्र.1518, दि.20/12/2019 | टॅक्सी रिक्षा पार्किंगसाठी उपलब्ध भूखंड क्षेत्रफळ निहाय "शिघ्रसिध्द गणक (Ready Reckoner )" दराने जागेच्या भाडयाची परिगणना करुन व सदर भाडे पायाभूत भाडे मानुन त्याअनुषंगाने स्वारस्य अभिव्यक्ती सुचना मागवुन जास्तीत-जास्त भाडेदर देणाऱ्या अनुज्ञाप्तीधारकासमवेत प्रत्येक वर्षी नुतनीकरण करण्याच्या अटीवर 5 वर्षाची "परवाना व अनुज्ञाप्ती" (Leave & Licence) तत्वावर संविदा करण्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 79 (क) व 243 (2) नुसार मा.महापालिका सर्वसाधारण सभेने मंजूरी दिलेली आहे. |
| 23 | "महाराष्ट्र महानगरपालिका स्थावर मालमत्ता भाडेपट्टा नुतणीकरण अथवा हस्तांतरण" नियम 2019 च्या अंमलबजावणीबाबत. | मंजूर ठराव क्र.<br>दि.11/03/2020 | दुकान गाळे/किऑक्स/फुडकोर्ट 05 वर्षाकरीता परवानगी व अनुज्ञा ततवावर देण्यात आलेले आहेत असे दुकान गाळे/किऑक्स/फुडकोर्ट पुढील 05 वर्षाकरीत मुदतवाढ प्रस्ताव मा.महासभेने मंजूर केलेला आहे. |